(२)

अति तातडीचे                                                    स्वातंत्र्य सैनिकांना ताम्रपत्र देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: टीएमपी-१२८८/स्वा.सै. कक्ष,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: ११ ऑगस्ट १९८८.

शासन निर्णय :- भारतीय स्वातंत्र्याचा ४० वा वर्धापन दिन समारोह समाप्तीच्या शुभ प्रसंगी शासनाने स्वातंत्र्य सैनिकांना ताम्रपत्र प्रदान करण्याचा समारंभ दिनांक १५ ऑगस्ट १९८८ रोजी आयोजित करण्याचे ठरविले आहे. केंद्रशासनाकडून विद्यमान पंतप्रधानांच्या सहीची फक्त १००० नवीन ताम्रपत्रे उपलब्ध होऊ शकल्याने हा समारंभ सध्या मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे, औरंगाबाद, नांदेड, अमरावती, नागपूर या जिल्ह्यांच्या ठिकाणी मर्यादित स्वरूपात करण्याचे ठरविले आहे. केंद्र शासनाकडून आवश्यक त्या संख्येत ताम्रपत्रे उपलब्ध होताच उरलेल्या जिल्ह्यांच्या ठिकाणी पुढे शुभ प्रसंगी ताम्रपत्र प्रदान करण्याचा समारंभ आयोजित करण्यात यावा. या समारंभाची व्यवस्था सर्व जिल्हाधिकारी यांनी जिल्हा गौरव समितीच्या सल्ल्यानुसार करावी. बृहन्मुंबईतील स्वातंत्र्य सैनिकांना ताम्रपत्र प्रदान करण्याचा समारंभ सचिवालय जिमखाना, ६ जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, सचिवालयासमोर, मुंबई ४०० ०३२ या ठिकाणी दिनांक १५ ऑगस्ट १९८८ रोजी सकाळी ११.१५ वाजता मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येईल.

२. या समारंभाच्या संदर्भात खालील सूचना देण्यात येत आहेत :-

१) ताम्रपत्र – केवळ हयात असलेल्या व ज्यांना यापूर्वी झालेल्या समारंभात ताम्रपत्र देण्यात आले नाहीत अशाच केंद्र शासन पेन्शनधारक स्वातंत्र्य सैनिकांना द्यावयाचे आहेत. दिवंगत स्वातंत्र्य सैनिकाची पत्नी अथवा वारसदार यांना द्यावयाचे नाहीत.

२) ताम्रपत्रावर ज्या ठिकाणी नांवे घालण्यासाठी जागा ठेवण्यात आली आहे त्या ठिकाणी संबंधित स्वातंत्र्य सैनिकाचे संपूर्ण नांव घालावे. स्वातंत्र्य सैनिकाचे नांव योग्य प्रकारे घातले जावे यासाठी संबंधित स्वातंत्र्य सैनिकाकडून त्यांचे नांव कागदावर लिहून घ्यावे. उदा. श्री. एस.पी. राऊत ऐवजी श्री. शंकर पांडुरंग राऊत असे नांव घालण्यात यावे.

[कृ.मा.प.]

३] ताम्रपत्र मिळण्यास पात्र असलेल्या स्वातंत्र्य [illegible] त्यांच्याविरुद्ध [illegible] काळात गुन्हा शाबीत होऊन दोषी ठरविण्यात आले असेल तर अशा स्वातंत्र्य सैनिकास ताम्रपत्र केंद्रशासनाची पूर्व संमती घेतल्याशिवाय देण्यात येऊ नये. जिल्हाधिकाऱ्यांनी अशा स्वातंत्र्य सैनिकांची नावे राज्यशासनास आपल्या सविस्तर अहवालासह कळवावीत.

४] समारंभाचे ठिकाण सर्व दृष्टीने सोईस्कर असे असावे.

ज्या स्वातंत्र्य सैनिकांना ताम्रपत्र द्यावयाचे आहे त्यांची बसण्याची व्यवस्था व्यासपीठाजवळ सन्मानपूर्वक करावी.

५] स्थानिक वर्तमानपत्रांमधून या समारंभाची जाहिरात करणेदेखील आवश्यक आहे.

६] ताम्रपत्राचे वितरण शक्यतो जिल्ह्यातील सर्वात ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिकाच्या हस्ते करावे.

या समारंभात गुलाबाचे फुल देऊन स्वातंत्र्य सैनिकाचा सन्मान करावा.

७] समारंभासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: उपस्थित राहून जिल्ह्यातील प्रमुख स्वातंत्र्य सैनिकांना, नेहमी समारंभासाठी बोलाविले जाते त्या सर्व व्यक्तींना/अधिकाऱ्यांना निमंत्रित करावे. समारंभाचे निमंत्रण संबंधितांना समारंभापूर्वी मिळेल याची खात्री करुन घेण्याची आवश्यकता आहे.

८] ताम्रपत्र स्वीकारण्यासाठी येणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांना येण्या-जाण्याचा प्रथम वर्गाचा रेल व बस प्रवासभत्ता द्यावा तसेच त्यांची रहाण्या/जेवणाची सरकारी पाहुणे म्हणून व्यवस्था जरुर करावी.

९] एखाद्या ठिकाणी जर समारंभासाठी येणारे स्वातंत्र्य सैनिक फार दुरवरुन येणारे नसतील व ते समारंभाच्या दिवशी सकाळी येऊन समारंभ आटोपल्यावर परत जाणार असतील तर अल्पोपहाराची व्यवस्था ठेवावी.

३. या समारंभाच्या संदर्भात येणारा सर्व खर्च, लेखाशीर्ष - "२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण [२०२] [सी] स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती इत्यादींना निवृत्तीवेतन [मागणी क्र. १३], संकेतांक क्र. २२३५००१५" या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व चालू वर्षासाठी जी रक्कम/

..३/-

त्या लेखाशीर्षाखालील मंजूर करुन्यात आली आहे त्या ...ून भागवावा.

हे आदेश वित्त विभागाच्या सल्ल्याने निर्गमित करण्यात येत आहेत. त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक: सीआर-९६८-व्यय-४, दिनांक ११.८.१९८८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(के.आर.कांबळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१] राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२] अध्यक्ष, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, [मुख्यमंत्री यांचे सचिवालय, मुंबई],
३] सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
४] सभापती, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
५] सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
६] मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
७] अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
८] शासनाच्या सर्व सचिवांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
९] महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-१ [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई [२ प्रती],
१०] महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-२ [लेखा व अनुज्ञेयता], नागपूर [२ प्रती],
११] सर्व मंत्रालयीन विभाग,
१२] सर्व विभागीय आयुक्त,
१३] सर्व जिल्हाधिकारी,
१४] सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
१५] सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१६] निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१७] सामान्य प्रशासन विभाग, का.क्र. ३४-व, मंत्रालय, मुंबई,
१८] महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
त्यांना विनंती करण्यात येते की, या समारंभाची प्रसिध्दी द्यावी,
१९] निवड नस्ती.

-----x-----

प्मसे/११.८.८८.